शहीद साथी

# डॉ. नरेंद्र दाभोळकर

## अव्वल राजकीय नेता

डॉ. बाबुराव गुरव

निर्मिती संवाद, कोल्हापूर

वैश्विक विवेकवादाचे विकासक

बर्ट्रांड रसेल,

डॉ. अब्राहम कोवूर

डॉ. रामस्सामी पेरियार

बी. प्रेमानंद

रिचर्ड डॉकिन्स/सॅम हॅरिस

हे आणि या वाटेवरील

सर्वांना सादर अर्पण...

# चला अस्वस्थता पेरूया!

''शहीद साथी डॉ. नरेंद्र दाभोळकर'' ही छोटी पुस्तिका अस्वस्थ तरुण वाचकांच्या हाती देताना एक समाधान वाटते आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा २० ऑगस्टला सकाळी गोळ्या घालून प्रतिगाम्यांनी खून केला. सारा महाराष्ट्र सुन्न झाला. भारत हालला. जगभर प्रतिक्रिया उमटल्या. तरुण तरुणींनी रस्त्यावर उतरून आक्रोश आरंभला. मी डॉ. दाभोळकरांचा विद्यार्थीदशेपासूनचा मित्र. राष्ट्र सेवा दल, समाजवादी युवक दल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही डॉ. दाभोळकरांची राजकीय, सामाजिक, संघटनात्मक विकासाची वाटचाल जवळून पाहिलेला मी त्यांचा सहकारी मित्र. त्यांच्या खूनाच्या धक्क्याने पूर्णपणे ढासळून गेलो. आजारी पडलो. अंथरूणाला खिळलो. सावकाशीने उमगत गेले आपण स्वतःला विवेकवादी म्हणवतो. मग थोडेतरी तसे वागले पाहिजे.

दरम्यान डॉ. दाभोळकरांबद्दल भरपूर लेखन प्रसिद्ध होत होते. ते सारे त्यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाभोवती फिरत होते. ते बरोबरही होते. परंतु अंधश्रद्धा निर्मूलन समिती एकटी, एकाकी नाही. ती शून्यात उभी नाही. तिचे तत्त्वज्ञान, कार्य, संघटन हे एका समग्रपरिवर्तनाच्या व्यापक चळवळीचे एक अंग आहे. ते एका समग्रव्यापी क्रांतिकारी राजकारणाचे एक अंग आहे. पक्ष, निवडणूका, सत्ता, पदे, भ्रष्टाचार, अडवणूक, जातीयवाद, घराणेशाही, झूंडशाही, हुकुमशाही, अरेरावी, अडवा अडवी, जिरवा जिरवी, फसवणूक, विश्वासघात, ही आणि अशी जी वैशिष्ट्ये आजच्या भारतीय राजकारणाने समोर आणली आहेत एवढेच राजकारण नसते, नाही. राजकारण हा शब्द खूपच व्यापक सखोल उंच आहे. त्याचे आयाम खूप वेगळे आहेत. मानववंशाने केलेल्या सकारात्मक, उत्पादक, संशोधनात्मक, प्रयोगात्मक, प्रतिभासंपन्न, त्यागकष्टावर जोपासलेल्या राजकारणामुळेच मानववंश आजच्या अवस्थेला पोहोचला आहे.